ePaper


# बारामतीत पुन्हा एकदा पवार विरुद्ध पवार असा संघर्ष पाहायला मिळणार

‖ वर्ष - 8 । अंक -107 ‖ UDYAM-MH-26-0158827 ‖

महाईन्यूज (TM)

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com ‖ शुक्रवार, दिनांक 25 ऑक्टोबर 2024 ‖ पुणे आवृत्ती ‖ mahaenews.com ‖ maha_enews ‖ Mahaenews



## आतील पानांत


- रोहितने कपिलचा लाजिरवाणा विक्रम
- सामना अर्धवट सोडून गेला क्रिकेटपटू
- सैन्याच्या वाहनावर दहशतवादी हल्ला
- अखेर पुन्हा काका पुतण्याचीच लढत


## सुपर कॉम्प्युटर, गणित तज्ज्ञ समजून घेताहेत विधानसभेचे गणित

# “85+85+85 म्हणजे 270!

## देवेंद्र फडणवीसांचा मविआला टोला, 278 जागांवर एकमत

। मुंबई । महाईन्यूज

**महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीची घोषणा झाली आहे. २० नोव्हेंबरला निवडणूक पार पडणार आहे आणि २३ नोव्हेंबरला निकाल लागणार आहे. आता याद्या जाहीर होत आहेत. महायुतीने आत्तापर्यंत १८२ जागा जाहीर केल्या आहेत. तर महाविकास आघाडीने १५८ जागा जाहीर केल्या आहेत. शिवसेना (उद्धव ठाकरे) ६५ जागा, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाच्या ४५ जागा आणि काँग्रेसच्या ४८ जागा जाहीर झाल्या आहेत. आज देवेंद्र फडणवीसयांनी नागपूरमध्ये बैठक घेतली. त्यानंतर माध्यमांशी संवाद साधला. यावेळी फडणवीस म्हणाले की, काँग्रेसने माझ्याविरोधात उमेदवार जाहीर केला आहे त्यांनाही शुभेच्छा आहे. २७८ जागा आम्ही ठरवल्या आहेत.**



त्यामुळे टेन्शन फ्री झालो आहे. आमचा अजेंडा आम्ही केलेली विकासकामं आहेत. आम्ही ज्या वेगाने निर्णय घेतले आणि विकास केला त्यावरच आम्ही निवडणूक लढवणार आहोत. ८५+८५+८५ म्हणजे २७० हे जे काही महाविकास आघाडीचं गणित आहे ते समजून घेण्याचा प्रयत्न सुपर कम्प्युटर आणि गणित तज्ज्ञ समजून घेत आहेत. असा टोला देवेंद्र फडणवीस यांनी महाविकास आघाडीला लगावला आहे. देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं की त्यांचं २७८ जागांवर एकमत झालं आहे. त्यामुळे टेन्शन फ्री वाटतं आहे. असं नागपूरमध्ये देवेंद्र फडणवीस यांनी माध्यमांना सांगितलं. आज त्यांनी महाविकास आघाडीच्या फॉर्म्युल्याचीही खिल्ली उडवली आहे. महाविकास आघाडीने बुधवारी पत्रकार परिषद घेतली. या पत्रकार परिषदेत संजय राऊत यांनी आणि नाना पटोले यांनी ८५+८५+८५ अशा २७० जागांवर आमचं एकमत झाल्याचं म्हटलं आहे. कारण या संख्येची बेरीज २५५ होते.

### काय म्हणाले देवेंद्र फडणवीस?

आमची बैठक सकारात्मक झाली आहे. १० जागांवर तोडगा बाकी राहिला आहे. ज्या जागा बाकी आहेत त्यावर तोडगा काढू, बाकीच्या जागाही घोषित होतील. महायुती म्हणून जे काही काम होतं ते झालं आहे. तुम्ही विचारण्याआधी सांगतो की महायुतीचा फॉर्म्युला दहा जागांचं ठरलं की आम्ही तुम्हाला सांगू असं देवेंद्र फडणवीस म्हणाले आहेत. महायुतीतले तीन घटक पक्ष यांनीही त्यांच्या जागा जाहीर केल्या आहेत. मात्र महायुतीचा फॉर्म्युला काय असेल हे सांगायची वेळ १० जागांचं ठरल्यावर सांगू असं देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केलं.

## पिंपरीत निष्ठवंताला संधी : आ. आण्णा बनसोडे यांच्या रथाचे योगेश बहल ‘सारथी’

## महायुतीच्या तीनही जागा निवडून आणणार : शहराध्यक्ष योगेश बहल यांचा निर्धार

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

पिंपरी-चिंचवड शहर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहराध्यक्ष योगेश बहल यांच्या नियुक्ती दुसऱ्याच दिवशी पिंपरीचे आमदार अण्णा बनसोडे यांची उमेदवारी जाहीर झाली. तर, मावळमधून आमदार सुनील शेळके यांनाही पुन्हा उमेदवारी मिळाली आहे. पिंपरी विधानसभा मतदारसंघ हा राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचा बालेकिल्ला मानला जातो. या मतदारसंघातून बनसोडे दोनदा, तर शिवसेनेचे गौतम चाबुकस्वार एकदा




निवडून आले होते. आता बनसोडे यांना पुन्हा तिसऱ्यांदा उमेदवारी मिळाली आहे. वास्तविक, प्रचंड विरोध असतानाही अजित पवार यांनी आपले अत्यंत निष्ठावान आमदार बनसोडे यांच्यावर विश्वास दाखवत तिकीट जाहीर केले आहे. दादांचाच एक निष्ठावंत आमदार असताना बाहेरचे उमेदवार आयात करण्याची काय गरज? असे म्हणत दादांनी बंडाचा झेंडा फडकावणाऱ्यांना जोरदार झटका दिला.

दरम्यान, पक्षात येणाऱ्यांची संख्या जास्त आहे. पण, पक्ष कोणालाही तिकीट देण्याचा निर्णय घेवू दे... पिंपरी-चिंचवडमध्ये महायुतीचे तीनही आमदार निवडून आणणार, असे घोषणा योगेश बहल यांनी केली आहे. त्यामुळे आमदार आण्णा बनसोडे यांच्या रथाचे सारथी बहल होतील, असा दावा राजकीय जाणकारांनी केला आहे.

### शहराध्यक्ष योगेश बहल ठरणार ‘किंगमेकर’...

आमदार अण्णा बनसोडे यांच्या उमेदवारीला माजी नगरसेवकांचा तीव्र विरोध होता. बनसोडे यांना तिकीट दिल्यास ते काम करणार नाहीत, असेही अजित पवार यांना सांगण्यात आले. दबाव आणल्यास त्यांनी पक्षाचा राजीनामा देऊन घरी बसणे पसंत केले. मात्र, बनसोडे यांची कामे करणार नाहीत, असा इशाराही दिला होता. मात्र, “निवडून येण्याची क्षमता” या निकषाच्या आधारे बनसोडे यांचे तिकीट निश्चित करण्यात आले. याउलट, पक्ष ज्याला उमेदवार घोषित करेल त्याला निवडून आणणे हे माझे काम आहे, असे शहराध्यक्ष योगेश बहल यांनी स्पष्ट केले होते. राष्ट्रवादी शरद पवार गटाकडून माजी नगरसेविका सुलक्षणा शिलवंत यांना उमेदवारी मिळण्याची दाट शक्यता आहे. शिलवंत आणि बहल यांच्या प्रचंड राजकीय संघर्ष आहे. आण्णा बनसोडे आणि योगेश बहल यांनी एकत्रित प्रयत्न केल्यास पिंपरीचे मैदान राष्ट्रवादी अजित पवार गट मारणार, हे सांगण्यासाठी कोणत्याही ज्योतिष्याची आवश्यकता नाही.

# पुण्यात पाटलांचा ‘विजयी शंखनाद’!

## चंद्रकांतदादा विक्रमी मताधिक्याने निवडून येणार: मुरलीधर मोहोळ



। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**कोथरूडचे आमदार चंद्रकांतदादा पाटील यांनी आज आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी काढलेल्या रॅलीत कोथरुडकरांकडून अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला. सर्वसामान्य कोथरुडकर मोठ्या उत्साहाने रॅलीत सहभागी झाले होते.**

कोथरूड मधून नामदार चंद्रकांतदादा पाटील मोठ्या मताधिक्याने निवडून येणार आणि राज्याचे कॅबिनेट मंत्री म्हणून पुन्हा शपथ घेणार असा विश्वास केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ यांनी यावेळी व्यक्त केला.यावेळी भाजपचे राष्ट्रीय सरचिटणीस सीटी रवीजी, केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ, खा. प्रा. डॉ. मेधाताई कुलकर्णी, भाजपा शहराध्यक्ष धीरज घाटे, शिवसेनेचे नाना भानगिरे, राष्ट्रवादी काँग्रेसचे दिपकभाऊ मानकर, आ. भीमराव तापकीर, सिद्धार्थ शिरोळे, योगेश टिळेकर, प्रदेश प्रवक्ते संदीप खर्डेकर, पुणे शहर भाजप सरचिटणीस पुनीत जोशी, कोथरुड मंडल दक्षिणचे अध्यक्ष डॉ संदीप बुटाला, उत्तरचे अध्यक्ष सचिन पाषाणकर यांच्या सह भाजपचे सर्व पदाधिकारी कार्यकर्ते आणि कोथरुड, बाणेर, बालेवाडी, पाषाण, सुतारवाडीमधील नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. उमेदवारी अर्ज दाखल करण्यापूर्वी नामदार चंद्रकांतदादा पाटील यांनी आज सकाळी शंकर महाराज, कसबा गणपती, मृत्यूंजयेश्वर मंदिराचे दर्शन घेतले. त्यानंतर डेक्कन येथील छत्रपती संभाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण केले. कोथरूड मधील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून रॅलीला सुरुवात झाली. या वेळी कोथरुड मधील प्रत्येक नागरिक मोठ्या उत्साहाने सहभागी झाला होता. कोथरूडकरांच्या मनातला आमदार, कोथरूडचे आमदार चंद्रकांतदादा पाटील, सर्वसामान्यांचा नेता पुन्हा होणार विजेता, था थकत ना थांबत जनसेवेसाठी दादा सदैव कार्यतत्पर अशा आशयाचे फ्लेक्स घेऊन अनेक कार्यकर्ते आणि कोथरुडकरांनी दादांना प्रतिसाद देत होते.

या रॅली दरम्यान केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ यांचे कार्यालय, हुतात्मा चौक, दशभुजा गणपती मंदिर, नळस्टॉट येथे फटाक्यांच्या आतिषबाजीमध्ये दादांचे स्वागत करण्यात आले.

### विक्रमी मताधिक्याने निवडून येतील

उमेदवारी अर्ज दाखल झाल्यानंतर माध्यमांशी संवाद साधताना केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ म्हणाले की, कोथरुडच्या जनतेने भारतीय जनता पक्षावर नेहमीच भरभरून प्रेम आणि आशीर्वाद दिले आहेत.देशाचे पंतप्रधान माननीय नरेंद्र मोदीजी यांचे गेल्या १० वर्षातील विकासकामे, मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांची राज्यभरातील सर्व सामान्य नागरिकांसाठी राबविलेल्या योजना आणि कोथरुडचे आमदार म्हणून चंद्रकांतदादा पाटील यांनी गेल्या पाच वर्षांत मतदारसंघात राबविलेले सेवा उपक्रम आणि विकासकामे यामुळे कोथरुडची जनता समाधानी आहे. त्यामुळे विधानसभा निवडणुकीत कोथरुड मधून नामदार चंद्रकांतदादा पाटील विक्रमी मताधिक्याने निवडून येतील हे आजच्या रॅलीला मिळालेल्या प्रतिसादामुळे सिद्ध झाले आहे, असा विश्वास व्यक्त केला. चंद्रकांतदादा पाटील म्हणाले की, लोकसभा निवडणुकीत कोथरूडकर जनतेने भारतीय जनता पक्षावर भरभरून प्रेम आणि आशीर्वाद दिले. केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांना ७५ हजारांपेक्षा जास्त मताधिक्याने विजयी बनवले. त्यामुळे आजच्या रॅलीला मिळालेला प्रतिसाद पाहून कोथरुड विधानसभा मतदारसंघातून विक्रमी मताधिक्याने विजयी होईल, असा विश्वास व्यक्त केला.

---

# तुमच्यासाठी पाच वर्ष रक्ताचे पाणी करेल : आ. सुनील शेळके

## महिलांचा मोठा सहभाग: उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी प्रचंड गर्दी




। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**विधानसभा निवडणुकीत तुमचे फक्त दहा दिवस मला द्या, तुमच्यासाठी हा सुनील शेळके पाच वर्ष रक्ताचे पाणी करेल.” तुमच्या सुखदुःखात आणि अडीअडचणीत तुमच्यासोबत उभा राहील हा विश्वास आज पोटोबा महाराजांच्या समोर तुम्हाला सर्वांना देतो अशी भावनिक साथ उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर मावळचे आमदार सुनील शेळके यांनी उपस्थित जनसमुदायाला घातली आहे.**

2019 पेक्षा जास्त प्रमाणात शक्ती प्रदर्शन करत आमदार सुनील शेळके यांनी आज मावळ विधानसभेसाठी दुसऱ्यांदा आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. आमदार सुनील शेळके यांना भेटण्यासाठी सकाळपासूनच मावळ तालुक्याच्या कानाकोपऱ्यातून वडगाव मावळ येथे नागरिक येण्यास सुरुवात झाली होती. 12:30 वाजण्याच्या सुमारास आमदार सुनील शेळके आपल्या समर्थकांसह मावळ तालुक्याचे ग्रामदैवत असलेल्या पोटोबा महाराजांच्या मंदिरात दाखल झाले. पोटोबा महाराजांचे दर्शन घेतल्यानंतर त्यांची भव्य दिव्य अशी रॅली ही पंचायत समिती चौकामध्ये दाखल झाली. त्या ठिकाणी सकाळपासूनच हजारोंच्या संख्येने महिला उपस्थित होत्या.

हजारोंच्या संख्येने समर्थक वडगाव मावळ येथे दाखल झाल्याने वडगावातील सर्व रस्ते हे गर्दीने तुडुंब झाले होते. मुंबई पुणे राष्ट्रीय महामार्गाच्या दुतर्फा वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. पंचायत समिती चौक ते वडगाव शहराचे प्रवेशद्वार दरम्यान सर्वत्र नजर जाईल तिथपर्यंत माणसंच माणसं दिसत होती.

मागील पाच वर्षे सातत्याने मावळच्या जनतेसाठी केलेली कामे व त्यामधून मिळालेले त्यांचे प्रेम यामुळेच एवढ्या मोठ्या प्रमाणात हा जनसमुदाय मला आशीर्वाद देण्यासाठी, माझा उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी येथे आला असल्याचे आमदार सुनील शेळके यांनी व्यासपीठावरून सांगितले. गर्दी रोखण्यासाठी पोलीस प्रशासनाच्या वतीने अनेक रस्ते बंद करण्यात आले होते मोठ्या प्रमाणात पोलीस पाऊस वाटा वडगाव मध्ये बंदोबस्तासाठी नेमण्यात आला होता.

### मावळ समृद्ध बनवण्याचा संकल्प...

उमेदवारी अर्ज दाखल करत सभास्थळी आमदार सुनील शेळके दाखल झाल्यानंतर कार्यकर्त्यांमधून मोठ्या प्रमाणात घोषणाबाजी झाली. मावळ तालुका राष्ट्रवादीचे अध्यक्ष गणेश खांडगे, स्वाभिमानी रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष रमेश साळवी, काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते माऊली भाऊ दाभाडे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे माजी तालुका अध्यक्ष गणेश आप्पा ढोरे यांची मनोगते झाल्यानंतर आमदार सुनील शेळके यांनी आपल्या खास शैलीमध्ये विरोधकांचा समाचार घेत उपस्थित जनसमुदायाला संबोधित केले. आमदार सुनील शेळके म्हणाले मागील पाच वर्ष मला जे जे काही माझ्या मायबाप जनतेसाठी करता आले ते सर्व काही करण्याचा मी प्रयत्न केला आहे. आता तुम्ही तुमचे दहा दिवस मला द्या, पुढील पाच वर्ष हा सुनील शेळके तुमच्यासाठी रक्ताचे पाणी करेल, तुमच्या सुखदुःखात, तुमच्या अडीअडचणीत तुमच्या सोबत उभा राहील. येणाऱ्या पाच वर्षांमध्ये मला मावळ तालुक्यातील सर्व जनतेला मोफत आरोग्याची सुविधा उपलब्ध करून द्यायची आहे. पर्यटनाच्या माध्यमातून या मावळ तालुक्याला समृद्ध बनवण्याचा माझा मानस असल्याचे त्यांनी सांगितले.

## पिंपरीतील आण्णासाहेब मगर स्टेडिअमचा “मेक ओव्हर”

# पिंपरीतील आण्णासाहेब मगर स्टेडिअमचा “मेक ओव्हर”!

## आमदार महेश लांडगे यांच्या संकल्पनेला प्रशासनाचे पाठबळ




। पिंपरी-चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिका प्रशासनाच्या माध्यमातून कै. आण्णासाहेब मगर स्टेडिअम आधुनिकपद्धतीने विकसित करण्यात येणार आहे. विशेष म्हणजे, या ठिकाणी शहरातील पहिला पिंपरी-चिंचवड स्पोर्ट्स क्लब उभारण्यात येणार आहे. प्रशासनाने या प्रकल्पाचा ‘प्रोजेक्ट रिपोर्ट’ तयार केला आहे. आगामी काळात या प्रकल्पाच्या माध्यमातून शहराच्या क्रीडा क्षेत्राला नवा आयाम मिळणार आहे.**

आमदार महेश लांडगे यांच्या संकल्पनेतून कै. आण्णासाहेब मगर स्टेडिअमचे पुनरुज्जीवन करण्यात करण्यात येत आहे. मात्र, सदर स्टेडिअम दुसरीकडे स्थलांतरीत करण्यात येईल, असा ‘फेक नॅरेटिव्ह’ पसरवण्याचा प्रयत्न राजकीय हेतुने केला जातो आहे. परंतु, यामध्ये तथ्य नाही.

मगर स्टेडिअमचा विकास २६ एकर जागेत होणार असून, या ठिकाणी पुण्यातील डेक्कन जीमखानाच्या धर्तीवर पिंपरी-चिंचवड स्पोर्ट्स क्लबही उभारण्यात येत आहे. शहराच्या क्रीडा व मनोरंजन क्षेत्राला चालना देण्यासाठी प्रशासनाने पुढाकार घेतला आहे. विशेष म्हणजे, महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या माध्यमातून आण्णासाहेब मगर स्टेडिअम संचलित केले जाणार आहे. याठिकाणी शॉपिंग मॉल, हॉटेल्स, क्लब हाउस, अ‍ॅकॅडमी निर्माण होतील. त्यामुळे क्रीडा, संस्कृती, मनोरंजन आणि आकर्षक वास्तू उभारण्यात येणार आहेत.

विशेष म्हणजे, या स्टेडिअमवर बॅडमिंटन कोर्ट्स, स्वॅश कोर्ट्स, रेस्टॉरंट, जिमनॅशिअम, हेल्थ क्लब, बॅन्क्वेट फॅसिलिटी, कार्ड रुम, मिटिंग रुम, बिझनेस सेंटर, रेसिडेन्सिअल रुम, टेनिस, स्विमिंग पूल, चिल्ड्रन एरिया, जॉगिंग ट्रॅक अशा सोयी-सुविधा निर्माण होणार आहेत. त्यामुळे शहराच्या क्रीडा क्षेत्रातील हा स्टेडिअम केंद्रबिंदू ठरणार आहे.

### शहराची वाटचाल स्पोर्ट्सिटीच्या दिशेने..

पिंपरी-चिंचवड शहराला स्पोर्ट्स सिटी बनवण्याचा संकल्प आमदार महेश लांडगे यांनी केला आहे. त्या संकल्पनेतूनच भोसरीतील आंतरराष्ट्रीय दर्जाचे कबड्डी व कुस्ती संकुल विकसित झाले. यासह राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय दर्जाची ऑर्चरी, बॉक्सिंग रिंग, रायफल शुटिंग, स्केटिंग अशी क्रीडा संकूल उभारली आहेत. आता आण्णासाहेब मगर स्टेडिअम व पिंपरी-चिंचवड स्पोर्ट्स क्लब होणार असल्यामुळे शहराच्या सौंदर्यात आणि लौकीकातही भर पडणार आहे.

### महाविकास आघाडीच्या सत्ताकाळात दुर्लक्ष..

मगर स्टेडिअमच्या नूतनीकरणाचा निर्णय भारतीय जनता पार्टीच्या सत्ताकाळात २०१९ मध्ये घेण्यात आला. तत्कालीन आयुक्त श्रावण हर्डिकर होते. त्यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीने या कामाला विरोध केला होता. दरम्यान, राज्यात सत्ता परिवर्तन झाले. महाविकास आघाडीची सत्ता आली. पण, मविआच्या अडीच वर्षांच्या काळात स्टेडिअमबाबत काहीही कार्यवाही करण्यात आली नाही. किंबहुना, नूतनीकरणाचे काम ‘जैसे थे’ होते. आता महायुतीच्या सत्ताकाळात स्टेडिअमसह पिंपरी-चिंचवड स्पोर्ट्स क्लबच्या कामासाठी कार्यवाही केली जात आहे. पण, महाविकास आघाडीतील इच्छुकांकडून स्टेडिअमच्या कामाचे राजकारण केले जात आहे. तसेच, चुकीच्या माहितीच्या आधारे पिंपरी-चिंचवडकरांमध्ये ‘फेक नॅरेटिव्ह’ पसरवण्यात येत आहे.

---

## “शंकरभाऊंच्या विजयात आमचा सिंहाचा वाटा असणार..”

### कामगार युनियनच्या मेळाव्यात युवकांची वज्रमुठ : मेळाव्यात तरुण सभासदांचा उत्स्फूर्तपणे सहभाग

। चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**चिंचवड विधानसभा निवडणुकीत पुढील २५ दिवस संघर्षाचे दिवस आहेत. आपला विजय निश्चितच आहे. त्यामुळे हा संघर्ष विजयासाठी नसून महाविजयासाठी करायचा आहे. शंकरभाऊंना मागील दोन निवडणुकांच्या तुलनेत अधिक मताधिक्याने आमदार पदी निवडून आणायचे आहे. आणि त्यासाठी आमचा सिंहाचा वाटा असेल असा संकल्प, माथाडी व जनरल कामगार युनियनच्या हजारो सभासदांनी केला.**



वाल्हेकरवाडी येथील चिंचवडे लॉन्स याठिकाणी भारतीय जनता माथाडी आणि सुरक्षारक्षक कामगार युनियन महासंघाचा भव्य मेळावा मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या मेळाव्याला शहरातील जवळपास १३०० हुन अधिक सभासद उत्स्फूर्तपणे सहभागी झाले होते. “सध्या समाजातील तरुणांना आपल्या राजकीय स्वार्थासाठी वापर करून घेण्याचे आणि वाममार्गाला लावण्याचे प्रकार सर्रासपणे सुरू आहे. मात्र शंकरभाऊ आणि अनुप मोरे यांनी आम्हाला रोजगाराची संधी उपलब्ध करून देत हजारो युवकांचे कुटुंब सावरण्याचे आणि आमची आर्थिक उन्नती करण्याचे काम केले आहे. त्यामुळे आम्ही कायम शंकरभाऊसोबत आहोत. व या निवडणुकीत एकजुटीने त्यांनाच आमदार करण्यासाठी काम करणार”, अशी भावना युनियनच्या पदाधिकारी व सभासदांनी व्यक्त केली.

यावेळी भारतीय जनता युवा मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष अनुप मोरे, माजी सत्तारूढ पक्षनेते नामदेव ढाके, माजी उपमहापौर सचिन चिंचवडे, माजी नगरसेवक शेखर चिंचवडे, युवा मोर्चाच्या सचिव तेजस्विनी कदम, माथाडी युनियनचे बाबू भोंडवे, प्रवीण यादव, इम्रान पानसरे, ऋत्विक कुटे, अजय थोरात, रोहन पवार, महेश पवार, सागर वाघमोडे, बबलू जोगदंड, विकी भिसे, गोट्या शर्मा, अमर गावडे, आकाश रणदिवे यांच्यासह भारतीय जनता माथाडी आणि सुरक्षारक्षक जनरल कामगार युनियनचे शहर पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### एक लाख मताधिक्याचा टप्पा ओलांडण्यासाठी आम्ही सज्ज – अनुप मोरे

पिंपरी चिंचवड शहरातील युवकांच्या रोजगारासाठी आणि त्यांना योग्य दिशा देण्यासाठी शंकर जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली आम्ही काम करत आहोत. भारतीय जनता युवा मोर्चा असो की माथाडी व सुरक्षारक्षक जनरल कामगार युनियन असो शंकरभाऊ नेहमी आमच्या सहकार्यासाठी तत्पर असतात. हीच तत्परता आता आम्ही व आमचे हजारो सदस्य या चिंचवड विधानसभा निवडणुकीत दाखविणार असून यावेळी किमान एक लाख मताधिक्याचा टप्पा ओलांडण्यासाठी आम्ही सज्ज आहोत.

### तीनही मतदारसंघात महायुतीच्या उमेदवारांना विजयी करण्याची जबाबदारी तुमची – शंकर जगताप

सर्वसामान्य जनता सुखात व आनंदात राहील हे ध्येय डोळ्यासमोर ठेवून आम्ही काम करतो. त्यामुळे आपल्याला राज्यात पुन्हा एकदा महायुतीचे सरकार आणायचे आहे. ही जबाबदारी आपल्या सर्वांची असून जास्तीत जास्त संख्येने सर्वसामान्य जनता मतदानासाठी बाहेर पडेल आणि आपल्या महायुतीच्याच उमेदवाराला मतदान करेल यासाठी आपण प्रयत्न करायचे आहेत.



## भूमिका

# प्रत्येकाला मतदानाचा अधिकार

**हिवाळा होता. हिमाचल प्रदेशातल्या पर्वतीय रांगांमध्ये तर थंडीचा कहर. या राज्यातील किन्नौर जिल्ह्यातील कल्पा नावाच्या गावात ३४ वर्षांचे श्यामसरन नेगी नावाचे प्राथमिक शिक्षक पहाटे चार वाजता उठले. अंग गारठवून टाकणाऱ्या थंडीतही पहाटे सहा वाजताच शाळेत पोहोचले.**

समुद्रसपाटीपासून सुमारे १० हजार फूट उंच असणाऱ्या या ठिकाणी मतदानाची व्यवस्था केली होती. नेगी शिक्षक असल्याने त्यांना निवडणुकीची ड्युटी होती. सुरुवातीला मतदान करून ९ किलोमीटर दूर असलेल्या दुसऱ्या गावी त्यांना जायचे होते. मतदान सात वाजता सुरू होणार होते; पण नेगी सरांनी साडेसहा वाजता मतदान करण्याची विनंती निवडणूक अधिकाऱ्यांना केली. त्यांना अनुमती देण्यात आली आणि नेगी सरांनी मतदान केले. स्वतंत्र भारतातले मतदान करणारे ते पहिले मतदार! उर्वरित भारतात निवडणुकांसाठी मतदान व्हायचे होते; पण हिमाचल प्रदेशातील भौगोलिक परिस्थिती लक्षात घेऊन दोन महिने आधीच मतदान सुरू झाले होते. नेगी सरांच्या मतदानाने भारताच्या राजकीय लोकशाहीची सुरुवात झाली. एका मोठ्या लोकशाहीच्या प्रयोगाची ती नांदी होती. नेगी सरांनी पहिले मतदान केलेच पण त्यानंतर कधीही न चुकता वेगवेगळ्या ३३



निवडणुकांमध्ये मतदान केले. अगदी मृत्यूच्या काही दिवस आधी २०२२ मध्ये वयाच्या १०५ व्या वर्षीदेखील त्यांनी अखेरचे मतदान केले. मला एका मताचे मोल ठाऊक आहे, त्यामुळेच मी कधीही मतदान चुकवले नाही, असे नेगी सर म्हणत.नेगी सरांनी बजावलेला अधिकार अतिशय महत्त्वाचा आहे. भारताच्या संविधानातील अनुच्छेद ३२६ नुसार प्रत्येकाला मतदानाचा अधिकार आहे. हा मताचा अधिकार मौलिक आहे कारण त्या अधिकारातूनच आपण आपल्या आवडीचे सरकार स्थापन करू शकतो. परिवर्तन घडवू शकतो. भारताने सार्वत्रिक प्रौढ मताधिकाराची पद्धत स्वीकारली. वय वर्षे २१ पूर्ण असणे आणि भारतामध्ये सहा महिने वास्तव्य असणे या केवळ दोन अटी होत्या मतदान करण्यासाठीच्या. फाळणी झाल्यामुळे स्थलांतर मोठ्या प्रमाणावर होत होते. त्यामुळे सहा महिने वास्तव्याची अट होती. पुढे ६१व्या घटनादुरुस्तीने (१९८९) मतदानाचे वय १८ वर्षे केले गेले; मात्र सुरुवातीपासून प्रत्येकाला मतदानाचा अधिकार आहे, हे मान्य केले गेले. अनेक देशांमध्ये सर्वांना मतदानाचा अधिकार मान्य करण्याबाबत आक्षेप होते, हरकती होत्या. सर्वसामान्य लोकांना राजकारणातले कळत नाही, ही धारणाच त्यामागे होती. विशेषत: अनेक देशांमध्ये स्त्रियांना मतदानाचा अधिकार नव्हता. नंतर त्यासाठी शिक्षणाची, संपत्तीची अट ठेवण्यात आली. भारतात मात्र अटी, शर्ती न ठेवता सरसकट सर्वांना मतदानाचा अधिकार मान्य केला आणि त्यासोबतच 'एक व्यक्ती, एक मत, एक मूल्य' हे राजकीय लोकशाहीचे मूलभूत तत्त्व मान्य केले गेले. त्यामुळे सर्वांच्या मताचे मोल सारखे आहे. 'एक मत, समान पत' असेही याबाबत म्हटले जाते. भारताच्या संविधानकर्त्यांनी सामान्य माणसाच्या समंजसपणावर विश्वास ठेवला आणि या ३२४ व्या अनुच्छेदाने प्रजेला नागरिक केले, मतदार केले. राजाला घरी बसवले. साम्राज्याला लोकशाही व्यवस्था बनवले. लोकशाहीला गर्भाशय दिले. यावरून या अधिकाराचे मोल लक्षात येईल.आपल्या एका मताने लोकशाहीत काय फरक पडतो, असे अनेकांना वाटते; मात्र इतिहास एका मताचे मोल सांगतो. फ्रान्समध्ये १८७५ साली एकाधिकारशाहीकडून लोकशाही गणराज्याकडे प्रवास घडला तो एका निर्णायक मतामुळे, तर १९९९ मध्ये भारतातले अटलबिहारी वाजपेयींचे सरकार कोसळले एका मतानेच.

देशाचा चेहरामोहरा बदलवण्याची ताकद एका मतात असते. त्यामुळेच मत बजावण्याचा निर्णायक अधिकार काळजीपूर्वक आणि सदसद्विवेकाने वापरला पाहिजे आणि परिवर्तन घडवले पाहिजे..नेगी सरांनी बजावलेला अधिकार अतिशय महत्त्वाचा आहे. भारताच्या संविधानातील अनुच्छेद ३२६ नुसार प्रत्येकाला मतदानाचा अधिकार आहे. हा मताचा अधिकार मौलिक आहे कारण त्या अधिकारातूनच आपण आपल्या आवडीचे सरकार स्थापन करू शकतो. परिवर्तन घडवू शकतो.

## प्रासंगिक »

### प्रवाहो आटला...

***मतदारसंघांची पुनर्रचना असो की राज्यांना अनुदाने/ निधी देणे... त्यास 'लोकसंख्या' हा निकष लावल्यास दक्षिणी राज्यांवर अन्यायच होणार...***

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकांच्या रणधुमाळीत एका महत्त्वाच्या विषयावर भाष्य करणे लांबणीवर पडले. हा विषय काही राज्यांतील घसरत्या लोकसंख्येचा. त्यास तोंड प्रथम फोडले आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांनी. त्यांनी आपल्या राज्यातील जनतेस अधिकाधिक संतती प्रसवण्याचा सल्ला दिला. इतकेच नाही. ते एक पाऊल पुढे गेले आणि अधिक जननसंख्येसाठी कायदा करण्याची शक्यताही बोलवून दाखवते झाले. दुसऱ्याच दिवशी दक्षिणी नायडू यांच्या सुरात दुसरे दक्षिण राज्यीय मुख्यमंत्री तमिळनाडूचे एम. के. स्टालिन यांनी आपलाही सूर मिसळला आणि त्यांनीही लोकसंख्या वृद्धीची भाषा केली. नायडू यांच्याप्रमाणे तेही केवळ तेवढ्यावर थांबले नाहीत. प्रत्येक महिलेने किमान १६ अपत्ये प्रसवावीत, असा 'सो(व)ळा' सल्ला त्यांनी दिला. आता सोळाच का, बारा का नाही किंवा अधिक दोन अपत्ये जन्मास घालून दीड-डझनाचा हिशेब पुरा का करू नये.

चार-पाच गावांतली भाषणे आटोपून सांगोल्यातल्या बैठकांना हजेरी लावून बापू पाटील परतले तेव्हा सायंकाळचे चार वाजले होते. पोटात अन्नाचा कण गेला नव्हता. दोन ठिकाणी कार्यकर्त्यांनी जेवणाचे ताट समोर धरले पण त्यांच्या डोळ्यासमोर 'ती' बंडलेच यायची.

# गरिबी हेच प्रचाराचे उत्तम हत्यार

गावाजवळच्या शेतात नव्यानेच बांधलेल्या प्रशस्त बंगल्यातून साहेबांना 'झाडी-डोंगर' दिसावे म्हणून नोकराने खिडक्या उघडताच त्यांनी रागाने त्याच्याकडे बघितले. ते आल्याची वर्दी मिळताच सारे दिवाणखान्यात जमले. त्यात 'त्या' काळरात्री गाडीत असलेले स्वीय साहाय्यक, कंत्राटदाराची माणसे, त्यांचा पुतण्या होते. या साऱ्यांना चाबकाने फोडून काढायला हवे असा विचार मनात आला पण निवडणूक काळात आणखी विघ्न नको म्हणत तो त्यांनी टाळला, सारे माना खाली घालून उभे असलेले बघून त्यांचा पारा चढला. 'मूर्खांनो, काही बोलाल की नाही' तरीही कुणी मान वर केली नाही. पाटलांनीच सुरुवात केली.असा' प्रवास रात्री करायचा नसतो एवढीही अक्कल नव्हती का तुम्हाला? ही आयडिया कुणाची होती," असे विचारताच साऱ्यांनी पुतण्याकडे बघितले. राजकारणात हे पुतणे अलीकडे बरेच अडचणीचे ठरू लागलेत असा विचार मनात आला पण त्यांनी तो बोलून दाखवला नाही. "अरे,



मी खानदानी मराठा. शेतजमिनीवर प्रेम करणारा. तरीही त्याचेच तुकडे विकून आजवर निवडणुका लढलो. पाटील असलो तरी बायकोला साडी घ्यायला पैसे नसतात असे सांगत गरिबीचे प्रदर्शन मांडत आलो. तुमच्या या एका चुकीमुळे माझे नाक कापले गेले. १९९९ ला कंत्राटदाराकडून लाखाची लाच घेताना रंगेहाथ पकडलो गेलो. पण हार न मानता जेलमधून निवडणूक लढवली. २५ वर्षांत तो डाग लोक विसरले. आता हा पुन्हा नवा कलंक माथी लावलाय तुम्ही. एकेकाळी माझ्या भाषणाच्या कॅसेट अख्ख्या माणदेशात विकल्या जात. आता कोणत्या तोंडाने भाषण करू मी? विरोधकांना भलेही 'खोके खोके' म्हणून ओरडू देत पण आरोप होत नाहीत तोवर गरिबी हेच प्रचाराचे उत्तम हत्यार असते. आज तुम्ही मला नि:शस्त्र करून टाकलेत रे! कुटुंबाला सुस्थितीत आणण्यासाठी सामान्य आमदाराला काय मेहनत करावी लागते हे नाही कळायचे तुम्हाला. गुवाहाटीला गेलो तेव्हा राज्यात सर्वत्र आमची छी थू होत होती. त्यातून मार्ग कसा काढायचा, लोकांचे मत कसे बदलायचे यावर विचार करत असताना मला 'काय झाडी व काय डोंगर'ची कल्पना सुचली. मग ठरवून फोन केला व संवाद व्हायरल केले. त्यानंतर लोकांचा राग कमी झाला. त्यातून मिळालेली 'बक्षिसी' तुम्हाला धड हाताळताही येत नसेल तर तुमची फौज काय कामाची? हपापाचा माल गपापा वाटला की काय तुम्हाला?"

"राजकारणात बरेच जण असतात पण अशी 'आवक' सुरू व्हायला मेहनत व नशीब दोन्ही लागते. त्यात मिठाचा खडा पडला की परिस्थिती पालटू लागते. आता आरोपाला उत्तरे देण्यातच माझा वेळ जाणार. वरून बंडले हातून गेली ती वेगळीच.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।<br>
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।<br>
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# गुरुपुष्यामृताला उमेदवारी अर्जांची पुण्याई!

## गुरुपुष्यामृत योग असल्याने अर्ज भरण्याला उमेदवारांचे प्राधान्य

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**विधानसभा निवडणुकीसाठी २२ ऑक्टोबरपासून अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. महाविकास आघाडी आणि महायुतीच्या जागा वाटपाचा तिढा सुटल्यानंतर आता उमेदरांकडून अर्ज भरले जात आहेत. २४ ऑक्टोबर रोजी गुरुपुष्यामृत योग असल्याने उमेदवारांनी आजचा मुहूर्त साधत अर्ज भरण्याला प्राधान्य दिलं .**



राष्ट्रवादी काँग्रेसचे ( शरद पवार ) आमदार जितेंद्र आव्हाड यांनी मुंब्रा येथे शक्तीप्रदर्शन केले माजी गृहमंत्री आर. आर. पाटील यांचे सुपूत्र रोहित पाटीलदेखील निडणुकीच्या रिंगणात आहेत. रोहित पवार यांच्या उपस्थितीत त्यांनी तासगावमधून उमेदवारी अर्ज दाखल केला वरळीतून शिवसेनेच्या ठाकरे गटाचे उमेदवार आदित्य ठाकरे यांनी वरळीत रॅली कडून अर्ज दाखल केला . तिवसा मतदारसंघाच्या काँग्रेसच्या उमेदवार यशोमती ठाकूर यांनी आज चौथ्यांदा उमेदवारी अर्ज दाखल केला त्यांनी मोझरी ते तिवसा अशी बाईकरॅली काढली. पुण्यातील कोथरूड मतदारसंघातून भाजपाचे उमेदवार चंद्रकांतदादा पाटीलदेखील ज उमेदवारी अर्ज दाखल केला . त्यांनी कोथरूडमध्ये शक्तीप्रदर्शन केलं बीडमध्ये धनंजय मुंडे उमेदवारी अर्ज भरला . त्यापूर्वी त्यांनी पंकजा मुंडे यांच्या घरी जात त्यांच्याकडून औक्षण करून घेतलं. भाजपाचे नेते अतुळ भातखळकर हेदेखील उमेदवारी अर्ज भरला . जालना मतदारसंघातून शिंदे गटाचे उमेदवार अर्जुन खोतकर उमदेवारी अर्ज दाखल केला भाजपातून राष्ट्रवादीत गेलेले हर्षवर्धन पाटील, येवल्यातून छगन भुजबळ यांनीही अर्ज दाखल केला ठाण्यातून ठाकरे गटाचे उमेदवार राजन विचारे , मनसेचे उमेदवार अविनाश जाधव यांनीही अर्ज भरला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मंत्री गुलाबराव पाटील यांनी देखील आज उमदेवारी अर्ज दाखल केला .जिल्ह्यातून गुलाबराव देवकर , दिलीप खोडपे, रोहिणी खडसे - खेवलकर मैदानात पुण्यात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी राष्ट्रवादी काँग्रेसची ४५ उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली. ही पहिली यादी असून दुसरी यादी पुढील दोन दिवसांमध्ये दुसरी जाहीर करणार असल्याचे म्हणाले.. जिल्ह्यातून जळगावम शार -गुलाबराव देवकर , जामनेर - दिलीप खोडपे आणि मुक्ताईनगर-- रोहिणी खडसे - खेवलकर मैदानात उतरल्या आहेत बहुप्रतिक्षित राष्ट्रवादी काँग्रेस शरचंद्र पवार पक्षाची पहिली यादी जाहीर करण्यात आली आहे. इस्लामपूरमधून जयंत पाटील रिंगणात असतीलय काटोल मतदारसंघातून अनिल देशमुख रिंगणात असणार आहेत. घनसावंगीमधून राजेश टोपे रिंगणात असतील. कराड उत्तरमधून बाळासाहेब पाटील यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. मुंब्रा कळवा मतदारसंघातून विरोधी पक्षनेते जितेंद्र आव्हाड यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. घनसावंगी ( जालना ) - राजेश टोपे , बारामती - युगेंद्र पवार , कोपरगाव - संदीप वर्पे , शेवगाव - प्रताप ढाकणे , पारनेर - खासदार निलेश लंके यांच्या पत्नी राणी लंके , आष्टी - महेबूब शेख , करमाळा - नारायण पाटील , कागल - समरजित घाडगे , तासगाव - रोहित पाटील , हडपसर - प्रशांत जगताप अशी अन्य काही उमेदवारांची नवे आहेत . जळगाव ग्रामीण मतदारसंघाचे आमदार आणि मंत्री गुलाबराव पाटील यांना पुन्हा विधानसभा निवडणुकीसाठी शिवसेनेकडून संधी देण्यात आली. आज गुलाबराव पाटील यांचा उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी हजारो कार्यकर्त्यांचा ताफा धरणगावात दाखल झाला होता. यावेळी शक्तिप्रदर्शन करत गुलाबराव पाटील यांनी आज दुपारी १ वाजून २५ मिनिटांनी उमेदवारी अर्ज दाखल केला. जळगाव ग्रामीण मतदारसंघाचे आमदार आणि मंत्री गुलाबराव पाटील यांना पुन्हा विधानसभा निवडणुकीसाठी शिवसेनेकडून संधी देण्यात आली.

### गुलाबराव पाटील यांचा अर्ज दाखल

जळगाव ग्रामीण मतदार संघातून शिवसेना शिंदे गटाचे नेते ना. गुलाबराव पाटील यांनी आज धरणगाव येथे शक्तिप्रदर्शन करत आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. खासदार स्मिताताई वाघ यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. जळगाव ग्रामीण मतदारसंघाचे आमदार आणि मंत्री गुलाबराव पाटील यांना पुन्हा विधानसभा निवडणुकीसाठी शिवसेनेकडून संधी देण्यात आली. आज गुलाबराव पाटील यांचा उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी हजारो कार्यकर्त्यांचा ताफा धरणगावात दाखल झाला होता. यावेळी शक्तिप्रदर्शन करत गुलाबराव पाटील यांनी आज दुपारी १ वाजून २५ मिनिटांनी उमेदवारी अर्ज दाखल केला.

# उद्धव ठाकरे यांनी पाठीमध्ये खंजीर खुपसला

## प्रमोद सावंत यांचा शिवसेनेवर जोरदार हल्लोबोल केला

। अमरावती ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**"पाच वर्षापूर्वी विधानसभेच्या झालेल्या निवडणूकीमध्ये शिवसेना-भाजप महायुती म्हणून निवडणूक लढवून आपण जिंकलो होतो. मात्र, शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी काँग्रेसला साथ देवून भाजपच्या पाठीमध्ये खंजीर खुपसला.**



अशा शब्दांमध्ये भाजपचे नेते आणि गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनी शिवसेनेवर जोरदार हल्लोबोल करताना विधानसभा निवडणूकीमध्ये पुन्हा एकदा शंभर टक्के महायुतीच विजयी होईल असा ठाम विश्वास व्यक्त केला. ते शिंदे गटाचे उमेदवार किरण सामंत यांचा उमेदवारी अर्ज भरल्या नंतर घेण्यात आलेल्या मेळाव्यात बोलत होते.विकसित भारतासोबत विकसित महाराष्ट्र आणि कोकण घडविण्यासाठी राजापूर विधानसभा मतदारसंघातून महायुतीचे उमेदवार किरण सामंत यांना साथ देण्याचे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

भाजपचे नेते आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानुसार सामंत यांचा उमेदवारी अर्ज भरण्यासाठी आपण आलो आहोत. सामंत यांच्या पूर्णपणे पाठीशी भाजप ठामपणे असून ते भरघोस मताधिक्याने निवडून येतील असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला. शहरातील पाटीलमळा येथेपाभाजपचे जिल्हाध्यक्ष राजेश सावंत, अशफाक हाजू, दीपक नागले, प्रकाश कुवळेकर यांच्यासह महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्यासंख्यने उपस्थित होते.

### विकासाला दिशा देणारे प्रकल्प

"राज्यातील महायुती सरकारने नारीशक्ती, शेतकरी, लाडकी बहिण यांसह समाजातील विविध घटकांसाठी विविध योजना राबवून विकास साधला आहे. महामार्ग, मेट्रो यांसारखे विकासाला दिशा देणारे प्रकल्प राबविले आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मार्गदर्शनाखाली विकसित भारत घडत असताना त्याच्यासोबत विकसित महाराष्ट्र आणि कोकण होण्यासाठी राज्यामध्ये महायुतीची सत्ता असणे गरजेचे आहे. त्यामुळे विधानसभा निवडणूकीमध्ये सर्वसामान्य जनता विकासाला पर्यायाने महायुतीला निश्चितच साथ देणार आहे.

# सैन्याच्या वाहनावर दहशतवादी हल्ला!

## रेझिस्टन्स फ्रंटने (टीआरएफ) हल्ल्याची जबाबदारी स्वीकारली

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज



**जम्मू-काश्मीरमधील बारामुल्ला जिल्ह्यातील गुलमर्गमध्ये एलओसीजवळ दहशतवाद्यांनी गुरुवारी संध्याकाळी लष्कराच्या वाहनावर हल्ला केला. या घटनेत 5 जवान जखमी झाले आहेत. सुरक्षा दलांनी परिसराला वेढा घातला असून दहशतवाद्यांचा शोध सुरू केला आहे. लश्कर-ए-तोएबाची संघटना असलेल्या रेझिस्टन्स फ्रंटने (टीआरएफ) हल्ल्याची जबाबदारी स्वीकारली आहे. रिपोर्ट्सनुसार, टीआरएफने गेल्या दीड वर्षात आपली रणनीती बदलली आहे. पूर्वी टीआरएफ काश्मीर पंडितांची टार्गेट किलिंग करत असे. आता ही संघटना बिगर काश्मिरी आणि शीखांना लक्ष्य करत आहे.**

आज सकाळी दक्षिण काश्मीरमधील पुलवामा जिल्ह्यातील बटगुंडमध्ये दहशतवाद्यांनी आणखी एका मजुरावर गोळीबार केला होता, ज्यात तो जखमी झाला होता. जखमी शुभम कुमार हा यूपीचा रहिवासी आहे. त्याच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. त्याचवेळी, गुरुवारी सकाळीच श्रीनगरमधील गनबाग परिसरात एका गैर-काश्मीरी तरुणाचा मृतदेह आढळून आला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मृत एमडी जाहूद हा पश्चिम बंगालचा रहिवासी होता. गेल्या आठवडाभरात जम्मू-काश्मीरमध्ये गैर-काश्मिरींवर झालेला हा तिसरा हल्ला आहे. यापूर्वी 20 ऑक्टोबरला गांदरबल आणि 18 ऑक्टोबरला शोपियानमध्ये दहशतवाद्यांनी टार्गेट किलिंग केली होती, ज्यात 7 लोक मारले गेले होते. सातत्याने होत असलेले दहशतवादी हल्ले पाहता आज राजभवनात उच्चस्तरीय बैठकही झाली. त्यात उत्तर विभागाचे कमांडर, जम्मू-काश्मीरचे डीजीपी, कॉर्प्स कमांडर आणि गुप्तचर संस्थांचे अधिकारी सहभागी झाले होते. याआधी 20 ऑक्टोबरच्या रात्री जम्मू-काश्मीरच्या गांदरबलमध्ये झालेल्या हल्ल्यात काश्मीरमधील एक डॉक्टर, एमपीचा एक अभियंता आणि पंजाब आणि बिहारमधील 5 मजुरांना आपला जीव गमवावा लागला होता. जम्मू-काश्मीरमधील बारामुल्ला जिल्ह्यातील गुलमर्गमध्ये एलओसीजवळ दहशतवाद्यांनी गुरुवारी संध्याकाळी लष्कराच्या वाहनावर हल्ला केला. या घटनेत 5 जवान जखमी झाले आहेत. सुरक्षा दलांनी परिसराला वेढा घातला असून दहशतवाद्यांचा शोध सुरू केला आहे. लश्कर-ए-तोएबाची संघटना असलेल्या रेझिस्टन्स फ्रंटने (टीआरएफ) हल्ल्याची जबाबदारी स्वीकारली आहे. रिपोर्ट्सनुसार, टीआरएफने गेल्या दीड वर्षात आपली रणनीती बदलली आहे. पूर्वी टीआरएफ काश्मीर पंडितांची टार्गेट किलिंग करत असे. आता ही संघटना बिगर काश्मिरी आणि शीखांना लक्ष्य करत आहे. जखमी शुभम कुमार हा यूपीचा रहिवासी आहे. त्याच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. त्याचवेळी, गुरुवारी सकाळीच श्रीनगरमधील गनबाग परिसरात एका गैर-काश्मीरी तरुणाचा मृतदेह आढळून आला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मृत एमडी जाहूद हा पश्चिम बंगालचा रहिवासी होता. गेल्या आठवडाभरात जम्मू-काश्मीरमध्ये गैर-काश्मिरींवर झालेला हा तिसरा हल्ला आहे. याआधी 20 ऑक्टोबरच्या रात्री जम्मू-काश्मीरच्या गांदरबलमध्ये झालेल्या हल्ल्यात काश्मीरमधील एक डॉक्टर, एमपीचा एक अभियंता आणि पंजाब आणि बिहारमधील 5 मजुरांना आपला जीव गमवावा लागला होता. याची जबाबदारी लष्करच्या द रेझिस्टन्स फ्रंट या संघटनेने घेतली आहे. बुधवारी या हल्ल्यात दहशतवादी सहभागी असल्याचे चित्र समोर आले. हातात AK-47 सारखी रायफल घेतलेला एक दहशतवादी एका इमारतीत शिरताना दिसत आहे. सूत्रांनी सांगितले की, टीआरएफ प्रमुख शेख सज्जाद गुल हा या हल्ल्याचा मास्टरमाईंड होता. दहशतवादी हल्ल्यात मारले गेलेले कामगार केंद्र सरकारच्या प्रकल्पावर काम करत होते. याची जबाबदारी लष्करच्या द रेझिस्टन्स फ्रंट या संघटनेने घेतली आहे. बुधवारी या हल्ल्यात दहशतवादी सूत्रांनी सांगितले की, टीआरएफ प्रमुख शेख सज्जाद गुल हा या हल्ल्याचा मास्टरमाईंड होता. दहशतवादी हल्ल्यात मारले गेलेले कामगार केंद्र सरकारच्या प्रकल्पावर काम करत होते.

### टीआरएफने घेतली जबाबदारी

टीआरएफला भारतात दहशतवादी संघटना म्हणून घोषित करण्यात आले आहे. भारतीय अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे की, टीआरएफची निर्मिती पाकिस्तानी दहशतवादी संघटना लष्करने केली आहे. हे लष्कर आणि जैशच्या केंडरला एकत्र करून तयार करण्यात आले आहे. काश्मिरी, काश्मिरी पंडित आणि हिंदूंच्या हत्येच्या अनेक घटनांमध्ये या संघटनेचा हात आहे. 2019 मध्ये जम्मू-काश्मीरमधून कलम 370 हटवल्यानंतर टीआरएफ अधिक सक्रिय झाली आहे. या हल्ल्याची जबाबदारी लष्कराने नव्हे तर टीआरएफने घेतली आहे.

# बारामतीत अखेर पुन्हा काका पुतण्याचीच लढत अटळ!

## पवारांविरुद्ध पवार; संपूर्ण देशाची नजर महाराष्ट्रातील या मतदारसंघावर

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**बारामतीत लोकसभा निवडणुकीमध्ये काका आणि पुतणे समोरासमोर आले आणि देशभरातील राजकारणाचे लक्ष वेधलं गेलं होतं. लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रात कोणाच्या किती जागा येतील यापेक्षा बारामतीत काय होणार याची चर्चा अधिक होती.**

६० वर्षाचा दीर्घ राजकारणाचा अनुभव असलेले शरद पवार आणि ३५ वर्षाचा राजकारणाचा अनुभव असलेले अजित पवार यामध्ये नेमके कोण सरस ठरणार याची देखील उत्कंठा होती, मात्र बारामती लोकसभा मतदारसंघात अजित पवारांना पराभवाचा सामना करावा लागला आणि काकांनी लढाई जिंकली. आता बारामती पुन्हा एकदा दुसऱ्या एका लढाईसाठी सज्ज झाली आहे. आता देखील ही लढाई काका आणि पुतण्यातच होणार आहे. ही लढाई अर्थातच उपमुख्यमंत्री अजित पवार आणि त्यांचे सखे पुतणे युगेंद्र पवार यांच्यातच होणार आहे. दोन दिवसापासून अजित पवारांच्या नावाचे फलक असलेल्या रिक्षा व त्यांच्या नावाचे मतदानाचे आवाहन करणारे फलक बारामती दिसल्यानंतर कार्यकर्त्यांच्या



जीवात जीव आला आहे. कारण गेल्या काही दिवसांपूर्वी अजित पवार यांनी लोकसभेला बसलेला फटका लक्षात घेऊन नाराजी व्यक्त केली होती. ती नाराजी व्यक्त करताना मी आठ ते नऊ निवडणुका लढलो, पण जर कितीही कामे करून आपल्याला जर खडा लागत असेल, तर त्या वाटेला जायला नको असे सुरुवातीला अजित पवारांनी सांगितले आणि राज्यात सगळीकडे चर्चा सुरू झाली की, आता अजित पवार बारामती लढणार नाहीत. त्याचवेळी अजित पवारांचे दुसरे पुत्र जय पवार यांनी जर दादांनी परवानगी दिली तर बारामतीतून लढायला आवडेल असे वक्तव्य केल्याने या संभ्रमात आणखीनच भर पडली. मध्यंतरी काही दिवस गेले आणि कार्यकर्त्यांनी मागोवा घेत अजित पवारच येथे पाहिजेत असा सूर लावला. तो सूर एवढा आक्रमक बनत गेला की, नंतर अजित पवारांच्या वाहना समोरच कार्यकर्ते झोपले आणि त्यांनी अजित पवारांनी आत्ताच उमेदवारी जाहीर करावी असा तगाजा लावला. हे सगळे महाभारत घडत असतानाच अजित पवारांनी चार दिवसापूर्वी एका मेळाव्यात बारामतीकरांना तुमच्या मनातीलच उमेदवार असेल असे वक्तव्य केले

### पुन्हा एकदा इतिहास घडण्याची चिन्हे

मात्र आता योगेंद्र पवार हेच राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे बारामतीतील शिलेदार असतील हे मात्र आता स्पष्ट झाले आहे. यामुळेच बारामती पुन्हा एकदा इतिहास घडण्याची चिन्हे आहेत काका आणि पुतण्याच्या लढतीत आतापर्यंत काका मात्र ठरले आहेत काका सरच ठरले आहेत. विधानसभेच्या निवडणुकीत हीच परंपरा कायम राहणार का..? की वेगळा इतिहास घडणार आणि बारामती शरद पवारांची की अजित पवारांची यावर्षी का मूर्तपणार याकडे पुन्हा एकदा राज्याचेच नाही देशाचेही लक्ष लागले आहे.

# तेव्हा माझं करिअर संपेल सलमान खान

बॉलीवूड अभिनेता सलमान खान गेल्या काही दिवसांपासून त्याच्या घरावर झालेल्या गोळीबारामुळे चर्चेत होता. परंतु, सध्या सलमान खानने ३५ वर्षांपूर्वी एक पत्र सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. 'मैंने प्यार किया' चित्रपटाच्या यशानंतर भाईजानने हे पत्र त्याच्या समस्त चाहत्यांना लिहिलं होतं. तसंच अभिनेता म्हणून प्रेक्षकांनी स्वीकारल्याबद्दल सलमानने त्याच्या चाहत्यांचे आभार मानले होते. सलमानचं हे पत्र मूळ स्वरुपात सिने ब्लिट्ज मासिकात प्रसिद्ध झालं होतं.सलमान खानने त्याच्या पत्रात नेमकं काय लिहिलं होतं याची उत्सुकता अनेकांना आहे. अभिनेत्याने त्याच्या लाखो प्रेक्षकांचे कसे आभार मानले जाणून घेऊयात... सलमान लिहितो, "मला आज तुम्हा सर्वांना माझ्याबद्दल काहीतरी सांगायचं आहे. सर्वप्रथम, एक अभिनेता म्हणून मला स्वीकारल्याबद्दल तुमचे खूप खूप आभार...मी माझ्या प्रत्येक चित्रपटात तुमच्या अपेक्षा पूर्ण करण्याचा प्रयत्न करेन. सध्या प्रत्येक चित्रपटाची निवड करण्यापूर्वी मी भरपूर विचार करत आहे. माझ्या विवेकबुद्धीनुसार मी चांगल्या कथांवर लक्ष केंद्रित करत आहे. कारण, मला माहित आहे की, यानंतर मी जे काही चित्रपट करेन त्याची तुलना 'मैंने प्यार किया'शी होणार आहे. त्यामुळे भविष्यात मी जेव्हा पण चित्रपटाची घोषणा करेन तेव्हा खात्री बाळगा की, तो एक चांगला चित्रपट असेल आणि मी त्यासाठी माझे शंभर टक्के देईन."सलमान पुढे लिहितो, "मी तुम्हा सर्वांवर प्रचंड प्रेम करतो आणि आशा करतो की तुम्ही सुद्धा माझ्यावर तसंच प्रेम करत राहाल.

# ३३ वर्षांपूर्वीच्या सुबोध भावेला पाहिलंत का?

चित्रपट असो वा मालिका आपल्या वेगवेगळ्या भूमिकांमधून अभिनयाचं कौशल्य दाखवत प्रेक्षकांची मन जिंकणारा अभिनेता म्हणजेच सुबोध भावे. सुबोधने त्याच्या पत्नी मंजिरीसाठी एक खास व्हिडी शेअर केला आहे. याबरोबरच तो एक नवीन गोष्ट प्रेक्षकांच्या भेटीला घेऊन येणार असल्याचंही सुबोध म्हणाला आहे. याबाबत सुबोधने त्याच्या इन्स्टाग्राम अकाउंटवर एक खास व्हिडीओ शेअर केला आहे.व्हिडीओमध्ये सुबोध भावे म्हणाला, "नमस्कार, आज आमच्या सेटवरून एक खास गोष्ट तुमच्याशी शेअर करायचीय. नवीन, नाजूक, हळूवार रोमँटीक गोष्ट लवकरच घेऊन येतोय मी तुमच्या सगळ्यांसाठी. आजच्या दिवशी ही गोष्ट शेअर करावीशी वाटली कारण आजचा दिवस खूप महत्त्वाचा आहे. आज ६ मे आणि बरोबर ३३ वर्षांपूर्वी १९९१ साली मी मंजिरीला प्रपोज केलं होतं आणि तिने मला हो म्हटलं होतं." "मंजिरी आठवतंय ना आणि कुठे हो म्हटलं होतस हे आठवतय का? पुण्याच्या बालगंधर्वच्या पुलावर. आमची ही लव्हस्टोरी सुरू झाली मग त्यानंतर तिच काही वर्ष इथे असणं. मग अचानक कॅनेडाला निघून जाणं. मग ती पत्र, चोरून पाठवलेली पत्र, मित्रांच्या नावाने पाठवलेली पत्र, त्यांची वाट बघण्यात गेलेले अनेक दिवस, मग हळूहळू इमेल्स आणि मग ४ ५ वर्षांच्या विराहानंतर मंजिरी परत आली. आठवतंय का?" "पण खर सांगतो तुझ्याबरोबर त्यानंतर आयुष्यातल्या सगळ्या सुख दुखांच्या गोष्टी शेअर केले.

# नाच गं घुमा!

परेश मोकाशी यांची चित्रपट दिग्दर्शित करण्याची आणि तो हाताळण्याची एक वेगळी हातोटी आहे. 'हरिश्चंद्राची फॅक्टरी'पासून 'वाळवी'पर्यंत हे आपण लक्षात घेतलं आहेच. आता त्यांचा नवा चित्रपट आला आहे ज्याचं नाव आहे 'नाच गं घुमा' मुक्ता बर्वे, नम्रता संभेराव, सुकन्या मोने, सुप्रिया पाठारे, शर्मिष्ठा राऊत, सारंग साठे यांच्या प्रमुख भूमिका असलेला चित्रपट आहे.चित्रपटाची कथा उच्च मध्यमवर्गीय त्रिकोणी घरात घडते. घरात कामासाठी बाई आली नाही किंवा वेळेवर आली नाही किंवा तिने सुट्टीच घेतली तर काय? या आजकालच्या नोकरी करणाऱ्या गृहिणीपुढे पडलेल्या प्रश्नांवर हा चित्रपट आधारलेला आहे. राणी (मुक्ता बर्वे) आणि आनंद (सारंग साठे) यांना शाळेत जाणारी एक मुलगी चिकू (मायरा वायकूळ) आहे. या दोघांनाही नोकरीसाठी जावं लागत असल्याने चिकूला सांभाळण्याचा प्रश्न सोडवण्यासाठी बारा तास काम करणारी बाई त्यांना हवी आहे. आशाताई (नम्रता संभेराव) या त्यांच्याकडे येतात. पण त्या वेळ पाळत नसतात. म्हणून राणी त्यांना कामावरुन काढून टाकते. पण मग राणी आणि आनंदची पंचाईत होऊ लागते, पण आशाताईंना परत काम दिलं जातं. आधी वेळ न पाळणाऱ्या आशाताई वेळेवर येऊ लागतात. नंतर एके दिवशी एक घटना घडते ज्यानंतर राणी अक्षरशः हाताला धरुन हाकलून देते. या सगळ्यानंतर काय काय घडतं?, आशाताई असं काय वागतात? राणीचं काय होतं? आनंदची भूमिका काय? या दोघांच्याही आया घरात राहण्यासाठी येतात तेव्हा काय होतं ? या सगळ्यावर सिनेमा भाष्य करतो.



# बांदेकरांनी सांगितला बॉलीवूडचा अनुभव

सुचित्रा बांदेकर यांनी केवळ मराठीतच नव्हे तर बॉलीवूडमध्येही आपल्या अभिनयाची छाप उमटवली आहे. रोहित शेट्टी दिग्दर्शित 'सिंघम' चित्रपटात त्यांनी साकारलेलं 'सुचित्रा भोसले' हे पात्र प्रेक्षकांच्या आजही लक्षात आहे. याशिवाय त्या रणवीर सिंहबरोबर 'सिम्बा' चित्रपटात झळकल्या होत्या. अलीकडेच त्या 'इंडियन पोलीस फोर्स' सीरिजमध्येही झळकल्या होत्या. त्यांचा बॉलीवूडमध्ये काम करण्याचा अनुभव कसा होता याबद्दल नुकत्याच एका मुलाखतीत सुचित्रा बांदेकर यांनी भाष्य केलं आहे. सुलेखा तळवलकर यांच्या 'दिल के करीब' कार्यक्रमात त्यांना हजेरी लावली होती. बॉलीवूडमध्ये गाजलेल्या 'सिंघम' चित्रपटात काम करण्याची संधी कशी मिळाली याबद्दल सांगताना सुचित्रा बांदेकर म्हणाल्या, ""सिंघम'च्या वेळी मला एका गृहस्थाचा फोन आला होता. त्यांनी मला फोनवर 'सुचित्रा बांदेकर का? आम्हाला तुम्हाला कास्ट करायचं आहे. रोहित शेट्टी प्रोडक्शनमधून बोलतोय.' कारण, मला त्या पहिल्या फोनवर तो 'द रोहित शेट्टी' आहे, तो मोठा दिग्दर्शक असं काहीच सुचलं नाही."सुचित्रा पुढे म्हणाल्या, "त्यानंतर त्या गृहस्थाने मला पुन्हा फोन केला आणि तुम्हाला कळतंय का मला काय म्हणायचंय? असा प्रश्न त्याने मला विचारला. यावर मी म्हणाले.



# कंगनाने अमिताभ यांच्याशी केली तुलना

लोकप्रिय बॉलीवूड अभिनेत्री कंगना रणौत निवडणुकीच्या मैदानात उतरली आहे. ती सध्या लोकसभा निवडणुकीच्या प्रचारात व्यग्र आहे. कंगना हिमाचल प्रदेशातील मंडी मतदारसंघातून भाजपाची उमेदवार म्हणून निवडणूक लढवत आहे. ती मंडी मतदारसंघात अनेक ठिकाणी प्रचारसभा घेत आहे व रॅलींमध्ये भाषणं देत आहे. आता एका निवडणूक रॅलीतील तिच्या भाषणाची सोशल मीडियावर खूप चर्चा होत आहे. या भाषणात तिने स्वतःची तुलना बॉलीवूडचे महानायक अमिताभ बच्चन यांच्याशी केली."संपूर्ण देश आश्चर्यचकित झाला आहे की मी राजस्थानला जावो, पश्चिम बंगालला जावो, दिल्लीला जावो किंवा मणिपूरला, लोक माझ्यावर इतकं प्रेम करतात, इतका आदर करतात. मी दाव्याने सांगू शकते की अमिताभ बच्चन यांच्यानंतर इंडस्ट्रीत इतकं प्रेम व आदर जर कुणाला मिळत असेल तर ती फक्त मी आहे," असं कंगना रणौत प्रचाराच्या भाषणात म्हणाली. कंगना रणौतचा हा व्हिडीओ व्हायरल झाल्यावर नेटकरी तिच्या फ्लॉप चित्रपटांचा उल्लेख करत तिला ट्रोल करत आहेत. "कंगनाचा शेवटचा हिट चित्रपट २०१५ मध्ये आला होता आणि त्यानंतर तिने बॅक टू बॅक १५ फ्लॉप चित्रपट दिले आणि इथे ती स्वतःची तुलना अमिताभ बच्चन यांच्याशी करत आहे", अशा शब्दांत कंगनाची खिल्ली उडवत एका व्हेरिफाईड पॅरोडी अकाउंटने तिचा व्हिडीओ शेअर केला आहे.मंडी लोकसभा मतदारसंघासाठी १ जूनला मतदान होणार आहे. हे शेवटच्या, सातव्या टप्प्यातील मतदान होईल. २०१९ मध्ये या मतदारसंघातून भाजपाचे राम स्वरुप शर्मा यांनी निवडणूक लढवली होती व ते विजयी झाले होते. पण २०२१ मध्ये त्यांच्या निधनानंतर या जागेवर झालेल्या पोटनिवडणुकीत काँग्रेसच्या प्रतिभा सिंह विजयी झाल्या होत्या.कंगना रणौत मुळची हिमाचल प्रदेशच्या मंडी जिल्ह्यातील आहे. याच ठिकाणाहून तिला भाजपाने लोकसभा निवडणुकीसाठी रिंगणात उतरवलं आहे. याठिकाणी शेवटच्या टप्प्यात मतदान होणार आहे. त्यापूर्वी कंगना रणौत मतदारसंघात फिरून प्रचारसभा घेत आहे. या निवडणुकीत कंगना रणौतला मतदार स्वीकारणार की नाही ते निकालांची घोषणा झाल्यावरच कळेल.लोकप्रिय बॉलीवूड अभिनेत्री कंगना रणौत निवडणुकीच्या मैदानात उतरली आहे. ती सध्या लोकसभा निवडणुकीच्या प्रचारात व्यग्र आहे. कंगना हिमाचल प्रदेशातील मंडी मतदारसंघातून भाजपाची उमेदवार म्हणून निवडणूक लढवत आहे. ती मंडी मतदारसंघात अनेक ठिकाणी प्रचारसभा घेत आहे व रॅलींमध्ये भाषणं देत आहे. आता एका निवडणूक रॅलीतील तिच्या भाषणाची सोशल मीडियावर खूप चर्चा होत आहे. या भाषणात तिने स्वतःची तुलना बॉलीवूडचे महानायक अमिताभ बच्चन यांच्याशी केली."संपूर्ण देश आश्चर्यचकित झाला आहे .

# रोहितने कपिलचा लाजिरवाणा विक्रम मोडला!

## रोहित शर्मा टिम साऊदीसमोर पुन्हा हतबल

नवी दिल्ली ।
। वृत्तसंस्था

**भारतीय संघाचा कर्णधार रोहित शर्माला पुण्यात खेळल्या जात असलेल्या दुसऱ्या कसोटी सामन्यात नकोसा विक्रम केला आहे. न्यूझीलंडचा संपूर्ण संघ २५९ धावांत गार झाल्यानंतर रोहित जैस्वालसह भारताला चांगली सुरुवात करुन देईल असे वाटत होते, परंतु तो शून्यावर बाद झाल्याने त्याच्या नावावर लाजिरवाण्या विक्रमाची नोदं झाली आहे.**



याबाबतीत कपिल देव यांनाही मागे टाकले आहे. जवळपास ९ वर्षांनी रोहित शर्मा मायदेशात कसोटी सामन्यात शून्यावर बाद झाला आहे. त्याला टिम साऊदीने क्लीन बोल्ड केले. रोहित शर्माला जवळपास ९ वर्षांनी हा दिवस मायदेशात पाहावा लागला आहे. याआधी २०१५ मध्ये, दिल्लीच्या फिरोजशाह कोटला स्टेडियमवर दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या सामन्यातील दुसऱ्या डावात तो शून्यावर बाद झाला होता. त्यानंतर आता रोहित शर्मा भारतात कसोटी सामन्यात शून्यावर बाद झाला आहे. तो शून्यावर बाद झाल्याने भारतीय चाहत्यांना मोठा धक्का बसला. तत्पूर्वी रविचंद्र अश्विन आणि वॉशिंग्टन सुंदर या फिरकीपटूनी भारतासाठी शानदार गोलंदाजी केली. त्यामुळे न्यूझीलंड संघाचा पहिला डाव पहिल्याच दिवशी पहिल्या गुंडाळण्यात यश आले.एवढेच नाही तर कर्णधार म्हणून शून्यावर आऊट होण्याच्या बाबतीत रोहित शर्माने कपिल देव यांना मागे टाकले आहे. या यादीत विराट कोहली पहिल्या क्रमांकावर आहे. आतापर्यंत तो १६ वेळा आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये कर्णधार म्हणून शून्यावर आऊट झाला आहे. सौरव गांगुली १३ वेळा आणि एमएस धोनी ११ वेळा शून्यावर बाद झाला आहे. आता रोहित शर्मानेही धोनीप्रमाणे ११ वेळा शून्यावर बाद होण्याचा नकोसा विक्रम केला आहे. कपिल देव आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये कर्णधार म्हणून १० वेळा शून्यावर आऊट झाले आहेत.ज्या गोलंदाजाने त्याला आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सर्वाधिक त्रास दिला आहे, त्याच गोलंदाजाविरुद्ध रोहित शर्मा पुन्हा एकदा बाद झाला. आतापर्यंत टिम साऊदीने त्याला १४ वेळा बाद केले आहे. कागिसो रबाडानेही त्याला १४ वेळा बाद करण्यात यश मिळविले आहे. यानंतर बोलायचे झाले तर, श्रीलंकेच्या अँजेलो मॅथ्यूजने त्याला १० वेळा आणि नॅथन लायनने ९ वेळा आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये बाद केले आहे. त्याचबरोबर ट्रेंट बोल्टने ८ वेळा आणि पॅट कमिन्सने ७ वेळा त्याला बाद केले आहे.भारत वि न्यूझीलंड कसोटीत भारताच्या दोन फिरकीपटूंनी इतिहास घडवला आहे. नाणेफेक गमावत प्रथम गोलंदाजीसाठी उतरलेल्या भारताकडून पुण्याच्या खेळपट्टीवर रविचंद्रन अश्विन आणि वॉशिंग्टन सुंदर यांनी भेदक गोलंदाजी केली. यांच्या भेदक गोलंदाजीच्या जोरावर भारताने न्यूझीलंडला पहिल्याच दिवशी २५९ धावांवर सर्वबाद केले. इतकेच नव्हे तर भारताने १४७ वर्षांच्या कसोटी इतिहासात कधीही न घडलेली कामगिरी आपल्या नावे केली आहे. रविचंद्रन अश्विन आणि वॉशिंग्टन सुंदर या दोन्ही चेन्नईच्या गोलंदाजांनी न्यूझीलंडच्या संपूर्ण संघाला तंबूत धाडले. २०२१ नंतर कसोटी संघात पुनरागमन केलेल्या सुंदरने आपल्या गोलंदाजीने सर्वांनाच चकित केले. वॉशिंग्टन सुंदरने अश्विनबरोबर भेदक गोलंदाजी करत आपल्या तालावर किवी फलंदाजांना नाचवले. सुंदरने तर ७ पैकी ६ विकेट हे क्लीन बोल्ड करत घेतले. रविचंद्रन अश्विनने सुरूवातीलाच एक विकेट घेत भारताला ब्रेकथ्रू मिळवून दिला. यानंतर अश्विनने झटपट ३ विकेट्स घेतले आणि लंच ब्रेकनंतर वॉशिंग्टन सुंदरने तर विकेट्सची रांगच लावली. वॉशिंग्टनने एकामागून एक ७ विकेट्स घेत न्यूझीलंडला ऑल आऊट करत त्याच्या फिरकीची जादू थांबली. अशारितीने भारताच्या दोन्ही ऑफस्पिन गोलंदाजी करणाऱ्या गोलंदाजांनी सामन्यात संपूर्ण १० विकेट्स घेण्याची ही पहिलीच वेळ आहे. याआधी फिरकीपटूंनी १० विकेट्स घेतल्या आहेत. पण फिरकीतही ऑफस्पिन गोलंदाजी करणाऱ्या गोलंदाजांनी कसोटी सामन्यात संपूर्ण १० विकेट्स घेण्याची ही कसोटी इतिहासात पहिलीच वेळ आहे.चेन्नईच्या या दोन्ही गोलंदाजांनी भारताला मोठा विक्रम आपल्या नावे करण्यात मोठी भूमिका बजावली. यापूर्वी भारतीय संघाच्या फिरकी गोलंदाजी विभागाने संपूर्ण १० विकेट्स घेतल्या आहेत. ज्यामध्ये २०२४ मध्ये इंग्लंडविरूद्ध झालेल्या सामन्यात जडेजा, अश्विन आणि कुलदीप या तिघांनी १० विकेट्स घेतले होते.

### अश्विन-सुंदरची जोडी जमली रे!

भारतीय क्रिकेटमध्ये यापूर्वी १९७३ मध्ये असे घडले होते, जेव्हा भारतीय फिरकीपटूंनी इंग्लंडविरुद्ध १० विकेट घेतले होते. पण भारताच्या फिरकीपटूंनी वर्षभरात दोनदा ही कामगिरी केली आहे. पुणे कसोटी आणि इंग्लंडविरूद्ध धर्मशाला कसोटीतही फिरकीपटूंनी संपूर्ण १० विकेट्स घेण्याची ही कामगिरी केली होती.पहिल्यांदा भारतीय फिरकीपटूंनी १९५२ साली इंग्लंडविरुद्ध एका डावात संघाच्या सर्व दहा विकेट घेतल्या होत्या. यानंतर बरोबर चार वर्षांनंतर १९५६ मध्ये कोलकात्यात कांगारू फलंदाजांची भारतीय फिरकीपटूंसमोर अशीच अवस्था झाली होती.

# सामना अर्धवट सोडून गेला क्रिकेटपटू

## क्रिकेटमध्ये पहिल्यांदाच घडला असा अनोखा प्रसंग

।नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**क्रिकेटमध्ये अनेकदा फलंदाजी करत असलेला खेळाडू दुखापत झाल्यामुळे रिटायर्ड हर्ट होऊन मैदानाबाहेर जाऊ शकतो, असं घडताना ही आपण अनेकदा पाहिलं आहे. पण ऑस्ट्रेलियामध्ये एक वेगळीच घटना घडली आहे. ऑस्ट्रेलियाचा खेळाडू चालू सामन्यातच रिटायर्ड होत आपल्या बाळाच्या जन्मासाठी गेला, पण नेमकं काय घडलं हे जाणून घेऊया.**




वेस्ट ऑस्ट्रेलियाचा अष्टपैलू खेळाडू हिल्टन कार्टराईट सध्या चर्चेत आहे. त्याच्या मुलाच्या जन्माची बातमी ऐकून तो चालू सामन्यात रिटायर होऊन बाहेर पडला. यावेळी शेफिल्ड शील्ड स्पर्धेत वेस्ट ऑस्ट्रेलिया संघाचा सामना तस्मानिया विरुद्ध सुरू होता. दरम्यान, हिल्टनला त्याच्या दुसऱ्या मुलाच्या जन्माची माहिती मिळताच त्याने सामना अर्ध्यातच सोडला. तो नाबाद ५२ धावांवर खेळत होता. तेवढ्यात टी-ब्रेकही झाला होता, या टी ब्रेक दरम्यान त्याला त्याच्या पत्नीचा फोन आला की ती हॉस्पिटलमध्ये दाखल होणार आहे. हे ऐकताच तो लगेच सामना सोडून हॉस्पिटलमध्ये निघाला.३१ वर्षीय खेळाडूने स्वतः सांगितले की, माझी पत्नी तमिका गरोदर होती. त्यामुळे माझ्या दुसऱ्या मुलाच्या जन्मामुळे सामन्यावर परिणाम होऊ नये, असे मला वाटत होते. म्हणून नंतर मी लगेच येऊन पुन्हा सामना खेळलो. सामना अधिकाऱ्यांनाही याबाबत माहिती दिली होती आणि त्यांनी मला खूप मदत केली. तो पुढे म्हणाला की, तस्मानिया संघालाही या गोष्टीची माहिती होती. यावेळी संघाचे प्रशिक्षक आणि कर्णधाराने मी केव्हा जाऊन परत येऊ शकतो, याचं संपूर्ण नियोजनही केलं होतं.

### कार्टराईटने 65 धावांची खेळी खेळली

दुसऱ्या मुलाच्या जन्मानंतर, कार्टराईटने मैदानात शानदार पुनरागमन केले आणि WACA मैदानावर आपला डाव पूर्ण केला. मात्र, हॉस्पिटलमधून परतल्यानंतर सामनाधिकारी त्याला मैदानावर पुन्हा जाण्याची परवानगी देतील की नाही, अशी चिंता त्याला सतावत होती. पण चर्चा केल्यानंतर तो पुन्हा क्रीझवर परतला आणि त्याने ६५ धावांची खेळी खेळली. कार्टराईटच्या खेळीमुळे पश्चिम ऑस्ट्रेलियाने पहिल्या डावात ३३२ धावा केल्या.